अनधिकृत वैद्यकीय व्यवसायास आळा घालण्याकरिता
प्रभावी उपाययोजना करण्याबाबत......

**महाराष्ट्र शासन**
**वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,**
**शासन परिपत्रक क्रमांक : सीआयएम-२००४/प्र.क्र.१२/०४/औभीनियम**
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२,
दिनांक :- ५ ऑगस्ट, २००८.

**परिपत्रक :-**

वैद्यकीय व्यवसाय करण्याची अर्हता प्राप्त नसतांना व वैद्यकीय परिषदेकडे नोंदणी न करता देखील राज्यामध्ये वैद्यकीय व्यवसाय करुन रुग्णांवर उपचार करणाऱ्या बोगस डॉक्टरांवर वेळोवेळी कारवाई करण्यांत येते. अशा डॉक्टरांनी उपचार केल्यामुळे रुग्णांच्या शरीरावर विपरित परिणाम होतो, अनेक रुग्णांना अवयव गमवावे लागल्याने कायमचे अपंगत्व येते तर काहींना प्राणही गमवावे लागतात.

२. अनधिकृत वैद्यकीय व्यवसायीकांचा (बोगस डॉक्टरांचा) शोध घेऊन त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यासाठी शासन निर्णय वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्र.सीआयएम/१०९१/सीआर-२७२/९१/एमईडी-८, दिनांक ५ सप्टेंबर, १९९१ नुसार जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय महानगरपालिका व नगरपालिकास्तरीय समित्या स्थापन करण्यांत आल्या आहेत. तसेच मुंबई महानगरपालिकेच्या क्षेत्रासाठी पोलिस आयुक्त, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली शासन निर्णय क्रमांक सीआयएम-१०९९/१७२८/प्र.क्र.३५८/ ९९/ औभीनियम, दिनांक ५ डिसेंबर, २००१ अन्वये समिती गठित करण्यांत आली आहे. त्याचप्रमाणे शासन निर्णय क्र.सीआयएम-१०९९/१७२८/प्र.क्र.३५८/९९/औभीनियम दिनांक १७ फेब्रुवारी, २००० अन्वये प्रत्येक जिल्ह्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली पुनर्विलोकन समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत.

३. या सर्व प्रक्रियेत सर्व सामान्य जनतेचा सहभाग व जनजागृती अत्यंत आवश्यक आहे असे शासनास वाटते. अनधिकृत वैद्यकीय व्यवसायावर आळा घालण्याच्या दृष्टीने खालील बाबी सामान्य जनतेच्या निदर्शनास आणण्याच्या दृष्टीने जिल्हाधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी, महानगरपालिकांचे आयुक्त व नगरपालिकेच्या मुख्य अधिकाऱ्यांनी पत्रके, भित्तीपत्रके, तसेच स्थानिक वृत्तपत्रामध्ये व दुरदर्शनच्या स्थानिक केबल ऑपरेटरमार्फत जाहीरात देऊन पुढील सूचना जनतेपर्यंत पोचवाव्या.

(अ) सर्व वैद्यकीय व्यवसायीकांनी कायद्याप्रमाणे संबंधीत परिषदांकडे वैद्यकीय व्यवसाय सुरु करण्यापूर्वी आपली नोंदणी करणे आवश्यक आहे. वैद्यकीय व्यवसायीकांची नोंदणी खालील संबंधीत परिषदांकडे करण्यांत येते.

जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी
शाखा:-
आवक नं.:- DC
ACT-G.R. (53)
2
12 AUG 2008

| | | |
|---|---|---|
| (एक) ॲलोपॅथी :- | | महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल, १८९-ए आनंद कॉम्प्लेक्स, दुसरा माळा, साने गुरुजी मार्ग, आर्थर रोड नाका, मुंबई-११. दुरध्वनी - २३०१०६६८, २३०५३०४३, २३०१२४६४ |
| (दोन) आयुर्वेद, युनानी व सिध्द :- | | महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल आफ इंडियन मेडिसीन, एस्प्लनेड मन्शन, ४ था मजला, १४४, महात्मा गांधी रोड, फोर्ट, मुंबई-२३. दुरध्वनी - २२८२६४२४, २२८४२४२५, २२०७२४६४. |
| (तीन) दंतचिकित्सा :- | | महाराष्ट्र स्टेट डेंटल कौन्सिल, २११, ए आनंद कॉम्प्लेक्स, २ रा माळा, साने गुरुजी मार्ग, आर्थर रोड नाका, मुंबई. दुरध्वनी -२३०११४१०. |
| (चार) होमिओपॅथी :- | | महाराष्ट्र होमिओपॅथी कौन्सिल, मुंबई, इमारत क्र २३५, पोनेनपुला मन्शन, ३ रा मजला, डॉ.दादाभाई नौरोजी मार्ग, फोर्ट, मुंबई. दुरध्वनी - २२७०४४००, २२७०३०८६. |

वैद्यकीय व्यवसायीकांनी वरील ठिकाणी केलेले आपले नोंदणी प्रमाणपत्र आपल्या दवाखान्यात दर्शनी भागावर लावणे कायद्याप्रमाणे बंधनकारक आहे. महाराष्ट्राव्यतिरिक्त इतर राज्यामध्ये वैद्यकीय अर्हता धारण करणाऱ्या व नोंदणी केलेल्या वैद्यकीय व्यवसायीकांना देखील आपले नोंदणी प्रमाणपत्र व्यवसायाच्या ठिकाणी दर्शनी भागावर लावणे बंधनकारक आहे.

(ब) वर नमुद केल्याप्रमाणे नोंदणी प्रमाणपत्र लावलेले नसल्यास अशा वैद्यकीय व्यवसायीकाकडे रुग्णांनी वैद्यकीय उपचार घेऊ नयेत. तसेच वैद्यकीय व्यवसायीकांच्या अर्हता व नोंदणी बाबत संशय आल्यास दक्षता म्हणून अशा वैद्यकीय व्यवसायीकाच्या वैधतेबाबत शहानिशा करण्यासाठी त्याची तक्रार वर नमूद केलेल्या संबंधीत परिषदेकडे तसेच जवळच्या पोलीस ठाण्यात आणि संबंधित समितीकडे करावी.

(क) वैद्यकीय व्यवसायीक संबंधित कोणत्याही वैद्यकीय परिषदेकडे नोंदणीकृत नसल्यास महाराष्ट्र वैद्यकीय व्यवसायी अधिनियम, १९६१ अन्वये असा वैद्यकीय व्यवसायी महाराष्ट्रात वैद्यकीय व्यवसाय करु शकत नाही व नोंदणी न करता वैद्यकीय व्यवसाय करतांना आढळल्यास सदर अधिनियमाच्या कलम ३३ व ३३-अ, अन्वये गुन्ह्यास पात्र ठरतो. अशा प्रकारचे गुन्हे वरील अधिनियमाच्या कलम ३८ अन्वये दखलपात्र व बिनजमानतीचे असून पहिल्या गुन्ह्यासाठी कमीत कमी २ वर्ष ते जास्तीत जास्त ५ वर्षापर्यंत सश्रम कारावास व कमीत कमी दोन हजार ते जास्तीत जास्त दहा हजारापर्यंत दंड तसेच दुसऱ्या वेळच्या गुन्ह्यासाठी १० वर्षापर्यंत सश्रम कारावास व कमीत कमी दहा हजार व पंचवीस हजारापर्यंत दंडाची तरतूद आहे.

त्याचप्रमाणे, अधिकृत वैद्यकीय व्यवसायी असल्याचे भासवून उपचार करणाऱ्या विरुध्द भारतीय दंड विधान संहितेच्या कलम ४१९ व ४२० अन्वये फसवणूकीचा व कलम ४६५ आणि ४६८ अन्वये बनावट दाखला बाळगल्याबद्दल गुन्हा होऊ शकतो.

४. अधिकृत वैद्यकीय व्यवसायीकांच्या असे निदर्शनास आणण्यात यावे की, अशा प्रकारे दवाखान्यात नोंदणी प्रमाणपत्र लावले नसल्याचे आढळून आल्यास ते महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेच्या अधिनियम १९६५ च्या कलम २२ अन्वये कारवाईस पात्र राहतील व प्रसंगी त्यांची नोंदणी कायमची रद्द होऊ शकते.

५. अनधिकृत वैद्यकीय व्यवसायीकांवर तातडीने कारवाई होण्यासाठी संबंधित समित्या, परिषदा तसेच पोलीस यंत्रणेने दक्षता घ्यावी व त्यास आळा घालण्यासाठी वेळोवेळी कठोर उपाययोजना कराव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(भा.सु.नायडू)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) सर्व जिल्हाधिकारी.
२) पोलिस महासंचालक, मुंबई.
३) सर्व पोलीस आयुक्त.
४) सर्व पोलीस अधिक्षक.
५) संचालक , वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
६) सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी.
७) महाराष्ट्र कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसीन, मुंबई.
८) महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल, मुंबई.
९) सर्व आयुक्त, महानगरपालिका.
१०) सर्व मुख्य अधिकारी, नगरपालिका.
११) सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य. डि.एम.एल.टी.(डिप्लोमा इन मेडिकल लॅबोरेटरी टेक्नॉलाजी)

त्यांना विनंती करण्यात येते की, हे परिपत्रक महाविद्यालयांच्या नोटीस बोर्डावर सर्व विद्यार्थ्यांच्या माहितीसाठी लावावे.

१२) महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

त्यांना अशी विनंती करण्यात येते की, सदर परिपत्रकातील स्पष्टीकरणास वृत्तपत्रातून विस्तृत प्रसिध्दी देण्याची कार्यवाही करावी.

*******